रे. मु. क्र. ७८/२०१३

**: निशाणी ५२ वर आदेश :**

(CNR No. MHAK07-0008872013)

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ सहकलम १५१ प्रमाणे दावा दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, अनावधानाने व टंकलेखनाच्या चुकिने दाव्यातील परिच्छेद क्र. ३ मधील ओळ क्रमांक ३ व ओळ क्र. १४ मध्ये सर्वे क्र. ३४९/१ ऐवजी ४४९/१ असा नमुद केला गेला आहे. तसेच दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ हे मयत झाले आहेत. त्यामुळे वादी दावामिळकतीमध्ये १/३ हिस्श्याला पात्र आहे. त्याअनुषंगाने वादीला दाव्यात व विनंती कलमात दुरुस्ती करुन मिळणे आवश्यक आहे. दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. त्यामुळे प्रतिवादी बाधीत होत नाही. अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरीमित नुकसान होईल. सबब, अर्ज मंजुर करावा.

३. प्रतिवादींनी सदर अर्जास विरोध करून म्हटले की, अर्जामध्ये कारण नमुद नाही. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादीच्या कथनांचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी खालील प्रश्ने उपस्थित होत असून त्यावर माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| | **प्रश्ने** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | नियोजित दुरुस्ती ही दाव्यातील वादाचे निराकरण करण्याकरीता आवश्यक आहे का? | होकारार्थी |
| २. | नियोजित दुरुस्ती मंजुर होउन मिळण्यास वादी पात्र आहे का? | होकारार्थी |
| ३. | अंतिम आदेश काय? | अर्ज मंजूर करणेत आला. |

## <u>: का र ण मी मां सा :</u>

५. **<u>प्रश्ने नं. १ व २ बाबत</u>** :- वादीचे अर्जातील कथन व प्रतिवादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुत दावा वादीने वाटणी, जाहीरनामा, ताबा आणि कायमस्वरुपी मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ हे नंतर मयत झाले आहेत. प्रस्तुत प्रकरणात वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून अद्यापपावेतो प्रतिवादींमार्फत त्यांचा उलटतपास पुर्ण झालेला नाही. वादीच्या दाव्याचे अवलोकन केले असता नियोजीत दुरूस्ती ही मुळ वाद कथनांशी सुसंगत असून मुळ वादकथनांचा आणखीन खुलासा करणारी आहे. तसेच सर्वे क्रमांक नमुद करण्यातील चुक ही टंकलेखनाच्या चुकिमुळे झाल्याचे स्पष्ट आहे. वरील परिस्थितीत वादीस नियोजीत दुरूस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींना देखील आवश्यक्ता भासल्यास परीणामी दुरुस्ती करण्यास किंवा त्यास आव्हान देण्याची संधी निश्चीतच मिळणार आहे.

६. सदर नियोजित दुरुस्तीने दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसून त्यामुळे उलट दाव्यातील संपुर्ण वादाचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. सदर नियोजित दुरुस्तीने प्रतिवादी यांना कोणताही बाधक परिणाम होणार नाही. सबब सदर नियोजित दुरुस्ती आवश्यक असून वादी सदर दुरुस्ती मंजूर होवून मिळण्यास पात्र आहे. सबब प्रश्ने क्र. १ व २ यांचे उत्तर होकारार्थी असे देण्यात येते. सबब वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. प्रश्न क्र. ३ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>: आ दे श :</u>

१) प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये २००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करणेत येत आहे.

२) वादीने नियोजित दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI

Digitally signed by CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI
Date: 2022.04.27 16:17:02 +0530

बाळापूर. (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक : २७.०४.२०२२. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 27/04/2022. |
| Signed by Presiding Officer on | : | 27/04/2022. |
| Uploaded on | : | 27/04/2022. |

-------------------------------------------------------------------------------------------